# महाराष्ट्र शासन

## पोलीस अधीक्षक कार्यालय लोहमार्ग, छत्रपती संभाजीनगर

दुरध्वनी क्र. : ०२४०-२३९२१०० भारतमाता चौक, पोलीस कॉलनी रोड, डीसीटीसी इमारत, छत्रपती संभाजीनगर४३१००१

Email ID - cybercrime.rly-abad@mahapolice.gov.in


जा.क्र. - / २१८२ / २०२४ दिनांक :- ०६ / ०७ /२०२४

**प्रेस नोट**

लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवर रिक्त असलेल्या ८० पोलीस शिपाई पदा करिता एकुण ४२३१ उमेदवारांनी आवेदन अर्ज सादर केलेले आहे. सदरची भरती प्रक्रियेतील उमेदवारांचे शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी दिनांक ०८/०७/२०२४ ते १२/०७/२०२४ या कालावधीत सकाळी 5.00 वाजले पासुन कवायत मैदान राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१४, सातारा परीसर, छत्रपती संभाजीनगर या मैदानावर सुरु होणार आहे.

रात्री लवकर आलेल्या उमेदवारांची गैरसोय होवु नये या करिता त्यांच्या राहण्याची व्यवस्था शौर्य मंगल कार्यालय, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१४, सातारा परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आली आहे. मैदानी चाचणीमध्ये उमेदवारांना अस्वस्थता वाटल्यास अगर जखमी झाल्यास त्यांना तात्काळ उपचारासाठी डॉक्टरांची टिम उपलब्ध करुन ठेवलेली आहे.

मा. स्वाती भोर, पोलीस अधिक्षक लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर यांनी उमेदवारांना आवाहन केले आहे की, त्यांनी कोणाच्याही भुलथापांना/अमिषाला/प्रलोभनाला बळी पडु नये कोणी भरती करुन देतो असे आश्वासन देत असल्यास तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच नियंत्रण कक्ष पोलीस अधिक्षक लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर यांचे ७४९९९३८५८५ या क्रमांकावर संपर्क करावा. तसेच लाचलुचपत विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयीन हेल्पलाईन क्र.1064 व 0240- 2334045, 9923023361, 9766557515 या क्रमांकावर संपर्क साधावा.

(स्वाती भोर)
पोलीस अधिक्षक, लोहमार्ग
छत्रपती संभाजीनगर

Scanned by CamScanner